## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.४२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०६/२०१७

**१) समोरील दाराचा कोंडा तोडुन घरात ठेवलेला लोखंडी कपाट फोडुन सोन्याचे दागीने व मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ३०/०५/२०१७ चे ०६.०० ते ३१/०५/२०१७ चे ०६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी विलास बिरजलाल दुधबरवे वय २६ वर्ष, रा. गौत्तम बुध्द वार्ड मेंढा भंडारा हा आपले साळीचे मयतीला बुटीबोरी नागपुर येथे घराला ताला लावुन गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन समोरील दाराचा कडी, कोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेला लोखंडी कपाट फोडुन त्यातील १ सोन्याची एकदाणी ५ ग्रॅम, सोन्याची पांचाली १० ग्रॅम, १ सोन्याचे मंगळसुत्र ०६ ग्रॅम, सोन्याच्या मनगटया २ ग्रॅम व १ बजाज कंपनीची मोटार सायकल क्र. पल्सर क्र. एमएच ३६ एन ४४२१ किंमती २०,०००/–रु. असा एकुण ६२,३००/–रु. चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक २६/०५/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी राजहंस कारुजी चोपकर वय ४५ वर्ष, रा. कोथुर्णा याचा मुलगा निखील चोपकर वय १७ वर्ष, हा रेंजर सायकलने कॅम्पुटर क्लास करुन त्याचा काका विजय चोपकर याला भेटण्यास गेला सायकला लॉक करुन रोडचे बाजुला ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन पाहुण हिरो कंपनीची लाल रंगाची रेंजर गेर असलेली किंमती ५,०००/–रु. सायकल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे गाडी स्लीप होवुन एकाचा मृत्यु व दोघ जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०४/०५/२०१७ चे १५.३० वा. यातील आरोपी मृतकने आपले ताब्यातील मोटार सायकल क्र. ३४ ए एफ ६६३१ ने पाहुण गाव वरुन नंदीगाव येथे तिब्बल सिट बसवुन जात असतांना पाहुण गाव ते परसोडी गावाजवळ राज्य मार्ग क्र. ३५४ वर त्याचे मोटार सायकल वरुन नियत्रंण सुटुन मोटार सायकल ही स्लीप झाल्याने स्वता:चे मरणास व मागे बसलेले इसम फिर्यादी व दशरथ कुथे यांना किरकोळ जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने मर्ग क्र. १४/२०१७ कलम १७४ जाफौ. चे चौकशी अहवाला वरुन पोस्टे. लाखांदुर येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि . निबेकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे आयसर ट्रकला मागेहुन धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक ३१/०५/२०१७ चे ००.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी संजय चोखेलाल बर्मन वय २९ वर्ष, रा. सिमरीया पोस्टे गोहणा त. छपरा जिल्हा शिवनी मध्य प्रदेश ह. मु. पिली नदी चौक नागपुर हा आपला आयसर ट्रक क्र. एमएच १४ डीएम १६४१ हा टोल नाका कारधा येथुन लाखनी साकोली कडे जातांनी टोल टॅक्स येथे पावती काढण्यास ट्रक उभा केला असता यातील मागेहुन येणाऱ्या १४ चक्का आरोपी ट्रक चालकाने आपले ताब्यातील वाहन लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे आयसर ट्रकला मागेहुन धडक देवुन नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम २७९,४२७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकास समोरुन धडक मारुन त्याचे पत्नीचे मरणास व त्यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुंन्हा नोंद . :—**

दिनांक ३१/०५/२०१७ चे १६.३० वा. यातील फिर्यादी राम मुलसागर वय ६० वर्ष, रा. कोंढा कोसरा हा पत्नी सौ. कांमक्षा अम्मा रामसागर वय ५० वर्ष, हिचे सोबत मोटार सायकल क्र. एमएच २७ येजी ४१३१ ने पवनी वरुन कोंढा येथे जात असतांना समोरुन येणाऱ्या आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकला समोरुन धडक दिल्याने फिर्यादीचे पत्नीचे मरणास व फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी जखमीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४,१३४/१९७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ३१/०५/२०१७ चे १६.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो.ना. खडसे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. निबार्ते पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**७) जंगल परीसरात पेट्रोलींग दरम्यान इसम मृत अवस्थेत आढळुन आला. . :—**

दिनांक ३१/०५/२०१७ चे १२.३० वा. दर. यातील फिर्यादी ज्ञानेश्वर तुकाराम पंचबुंधे वय ५१ वर्ष, रा. कवडसी पद वन मजुर वन परक्षेत्र पवनी हा कोरंभी जंगल परीसर पेट्रोलींग करीत असतांना यातील मृतक सुरेश तुकाराम पंचबुधे वय ६५ वर्ष, रा. चिचखेडा हा मृत अवस्थेत आढळुन आल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

८) अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक ३१/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. मोहाडी, कारधा, वरठी, तुमसर, सिहोरा, आंधळगाव, साकोली, पालांदुर, पवनी, अडयाळ व तुमसर येथे अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १७ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५७ लिटर हातभट्टी दारु किंमती १०२५०/–रु. १२ लिटर २० मिली लिटर देशी + विदेशी+ बिअर दारु किंमती ३९८०/–रु. तसेच जुगारातुन किंमती ४३०/–रु. असा एकुण किंमती १४,६६०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ३१/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती १३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.